मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थेरगावातील कर्करोग रुग्णालयाला गती

## 34 गुंठे जागेत सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर रुग्णालय उभारण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या कर्करोग रुग्णालय उभारणीला अखेर गती मिळाली आहे. थेरगावमध्ये ३४ गुंठे जागेत सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर रुग्णालय उभारण्यात येणार आहे. निविदेला तीन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर एका ठेकेदाराची निविदा महापालिका प्रशासनाने स्वीकारली असून, ती अंतिम टप्प्यात आहे. हे १०० खाटांचे रुग्णालय दोन वर्षांत सुरू करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची 'वायसीएम'सह आठ मोठी रुग्णालये आहेत. मात्र, एकाही रुग्णालयात कर्करोगावरील उपचारांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध नाही. गेल्या काही वर्षांमध्ये कर्करोगग्रस्त रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. खासगी रुग्णालयांमधील उपचारांचा खर्च सर्वसामान्य रुग्णांच्या अवाक्याबाहेर आहे. त्यामुळे कर्करोग रुग्णालय उभारण्याची मागणी होत होती. त्यानुसार महापालिकेने थेरगावातील नवीन रुग्णालयाशेजारी असलेल्या ३४ गुंठे मोकळ्या जागेत रुग्णालय उभारण्याचे नियोजन केले. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर रुग्णालय उभारण्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली.

परंतु, प्रतिसाद मिळाला नाही. निविदेला तीन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही एकच ठेकेदार सहभागी झाला. त्यामुळे या ठेकेदाराला काम देण्याचे निश्चित करण्यात आले. ठेकेदाराला ३० वर्षांसाठी जागा दिली जाणार आहे. ठेकेदाराने दोन वर्षांत ११ मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक आहे. यंत्रसामग्री, मनुष्यबळ, रुग्णालय चालविण्याची जबाबदारी ठेकेदाराची असणार आहे. महापालिका ठेकेदाराला ६० कोटींचा तफावत निधी देणार आहे.

केमो थेरपी, रेडिएशन थेरपी, शस्त्रक्रिया, समुपदेशनासारख्या सहायक सेवाही या रुग्णालयात पुरविण्यात येणार आहेत. हे रुग्णालय स्तन, फुफ्फुस, प्रोस्टेट आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगासह विविध प्रकारच्या कर्करोगांची पूर्तता करण्यासाठी सुसज्ज असणार आहे. रुग्णालयामध्ये लीनिअर एक्सलरेटर्स, ब्रेकीथेरपी युनिट्स आणि पीईटी-सीटी स्कॅनची सुविधाही देण्यात येणार असल्याचे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.



### अल्प दरांत उपचार

» महापालिकेने महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचे दर निश्चित केले आहेत. ठेकेदाराला या दराप्रमाणेच पैसे घ्यावे लागणार आहेत. त्यामुळे अल्पदरात उपचार मिळणार आहेत.

" निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. प्रस्ताव दर पडताळणीसाठी निविदा समितीकडे पाठविला आहे. त्यानंतर स्थायी समितीची मान्यता घेऊन कामाचा आदेश दिला जाईल. इमारतीचे काम दोन वर्षांत पूर्ण करून रुग्णालय सुरू करण्यात येईल. रुग्णालय सर्वसामान्यांसाठी उपयुक्त ठरेल.

**- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# चिखली, चऱ्होलीची 'टीपी स्कीम' रद्द होणार

## आमदार लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक; आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाची प्रस्तावित TP SCHEM अखेर रद्द होणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे भूमिपुत्र आणि ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित 'टीपी स्कीम' बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली. सुमारे तीन तास सुरू असलेल्या बैठकीमध्ये लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांची भूमिका ठामपणे मांडली.

पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर



पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभे केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महापालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका आमदार लांडगे यांनी आयुक्तांसमोर मांडली.

प्रस्तावित टीपी स्कीमबाबत चिखली आणि चऱ्होली या दोन्ही गावातील ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष होता. आमदार महेश लांडगे यांनीही सातत्याने टीपी स्कीमला विरोध केलेला आहे. त्यामुळे 'टीपी स्कीम' बाबत काय निर्णय होतो? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले होते. दरम्यान महापालिका आयुक्त रजेवर होते. आज आयुक्त महापालिकेत रुजू झाल्यानंतर तात्काळ बैठक घेण्यात आली. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळताना दिसत आहे.

# महापालिकेची अतिक्रमण कारवाई सुरू

## महापालिकेची अतिक्रमण कारवाई सुरू : सलग तिसऱ्या दिवशी महापालिकेची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांतील रस्त्यांवर पथारी व्यावसायिक तसेच दुकानांसमोरील मोकळ्या आणि आजूबाजूच्या जागेत व्यावसायिकांनी बांधकामे केल्याच्या तक्रारी वाढल्याने महापालिकेने अतिक्रमण कारवाई सुरू केली आहे. शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशी अतिक्रमण विभाग आणि बांधकाम विभागाने एकत्रित कारवाई करत अतिक्रमणे काढून टाकली. १६ मे पर्यंत कारवाई करण्याचे नियोजन महापालिकेने तयार केले आहे.



या दोन्ही विभागांच्या पथकांनी शुक्रवारी शिवाजी रस्त्यावरील अतिक्रमणे काढून टाकली. परिमंडळ पाच अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याच्या दोन्ही बाजू शनिवार वाडा ते स्वारगेट येथील देशभक्त केशवराव जेधे चौक रस्त्यावरील विक्रेत्यांवर ही कारवाई करण्यात आली. महापालिकेने गेले तीन दिवसांपासून अतिक्रमणांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संदीप खलाटे व परिमंडळ उपायुक्त सुनील बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व सहायक आयुक्त किसन दगडखैर व सुहास जाधव यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

अभय शिंदे, उमेश नरुले, श्रीकृष्ण सोनार, राहुल महाजन, अविनाश इंगोले, सुभाष जगताप, शरद मरकड यांच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत टेबल, खुर्च्या, मंडप, काउंटर असे सुमारे आठ ट्रक पथारी साहित्य जप्त करण्यात आले. तर साडेपाच हजार चौरस फूट क्षेत्र मोकळे करण्यात आले. शहराच्या विविध भागांत पुढील काही दिवसांत ही कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आल्याचे उपायुक्त खलाटे यांनी सांगितले.

### नगर रस्त्यावरही झाली कारवाई

» नगर रस्त्यावरील खराडी झेन्सार आयटी पार्क परिसरातील व खराडी मुंढवा बायपास रस्त्यावरील अतिक्रमणांवरही शुक्रवारी हातोडा मारण्यात आला. नगर रस्ता वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त संजय पोळ यांच्या नेतृत्वाखाली उमेश गोडगे, मंगेश गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली. या कारवाई ३४ काउंटर, आठ हातगाड्या, सिलिंडर, पथारी, खुर्च्या, टेबल, जाळ्या हे साहित्य जप्त करण्यात आले.

# पावसामुळे काढलेला गाळ पुन्हा चेंबरमध्ये

## कामाचे कोणतेही बिल संबंधित ठेकेदारांना देणार नाही : महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळापूर्व कामासाठी पावसाळी गटारे, ड्रेनेजलाइन स्वच्छ करून काढण्यात आलेला राडारोडा आणि गाळ शुक्रवारी शहरात अचानक पडलेल्या पावसामुळे पुन्हा गटारातच गेल्याचे समोर आले. काम झाल्यानंतर काढलेला गाळ संबंधित ठेकेदाराने त्वरित न उचलल्याने आणि महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चेंबरच्या कडेला काढून ठेवलेला गाळ चेंबरमध्येच गेला. दरम्यान, या कामाचे कोणतेही बिल संबंधित ठेकेदारांना देणार नाही, असे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.



शहरात पावसाळ्यात ड्रेनेज, पावसाळी गटारांमध्ये कचरा साचून राहिल्याने पाणी वाहून जात नाही. त्यामुळे अनेक भागांतील नाले, पावसाळी गटारे तुंबून पाणी नागरिकांच्या घरात घुसण्याचे प्रकार घडले आहेत. या पार्श्वभूमीवर पावसाळा सुरू होण्यापूर्वीच शहरातील नाले, ओढे, गटारे स्वच्छ करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. त्यासाठी आवश्यक ती निविदा प्रक्रिया राबवून हे काम सुरू करण्यात आले आहे. ३१ मेपूर्वी ही पावसाळी कामे पूर्ण करण्याचा संकल्प महापालिकेने केला आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये पावसाळापूर्वीची कामे ठेकेदारांकडून सुरू असून, काढलेला गाळ दुसरीकडे उचलून न टाकता गटाराच्या जवळच ठेवला जातो. त्यामुळे तो पुन्हा चेंबरमध्ये जाण्याची शक्यता आहे. तसेच काही भागांतील चेंबरची झाकणे तुटलेली असल्याने रस्त्यावरील कचरा, काढलेला गाळ पुन्हा गटारांमध्ये जाऊन चेंबर तुंबण्याची शक्यता आहे, असे वृत्त तीनच दिवसांपूर्वी 'लोकसत्ता'ने प्रसिद्ध केले होते. त्यावर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी संबंधित ठेकेदारांना काम केल्यानंतर काढलेला गाळ उचलून दुसरीकडे टाकण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले होते.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी गाळ उचलण्याबाबत आदेश दिल्यानंतरही संबंधित ठेकेदारांनी गाळ उचलला आहे की नाही, याकडे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे शुक्रवारी समोर आले. काम केल्यानंतर काढण्यात आलेला हा गाळ आणि राडारोडा उचलण्यात न आल्याने अचानकपणे पडलेल्या पावसामुळे हा गाळ पुन्हा चेंबरमध्ये आणि गटारांमध्ये वाहून गेला. महापालिका अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने न पाहिल्याने आता पुन्हा हे चेंबर स्वच्छ करण्यासाठी महापालिकेला निधी खर्च करावा लागणार आहे.

> " पावसाळी गटारे, चेंबर स्वच्छ केल्यानंतर काढलेला गाळ न उचलल्याने तो पुन्हा चेंबरमध्ये गेल्याचे समोर आले आहे. ठेकेदारांच्या दुर्लक्षामुळे हा प्रकार घडला असून, या कामांची बिले संबंधित ठेकेदाराला दिली जाणार नाहीत.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# पाकिस्तानी व्हिसाची पुन्हा पडताळणी

## पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या 290 पाकिस्तानी नागरिकांचे दीर्घकालीन व्हिसावर वास्तव्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय नागरिकत्व मिळवण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये लाँग व्हिसावर राहणाऱ्या २९० पाकिस्तानी नागरिकांना पुन्हा व्हिसा प्रक्रिया करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील दोन महिन्यांत ऑनलाईन पद्धतीने ही सर्व प्रक्रिया पार पडावी लागणार आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडावा, असे आदेश केंद्र सरकारने दिले होते. गेल्या अनेक वर्षांत पाकिस्तानातून आलेल्या हिंदूंना पिंपरी-चिंचवडने आश्रय दिला असून, सध्या २९० जण भारतीय नागरिकत्वाच्या प्रतीक्षेत आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पाकिस्तानी हिंदू नागरिकांचे वास्तव्य आहे. सुमारे ३०० हून अधिक पाकिस्तानी हिंदू नागरिकांना भारताने नागरिकत्व देऊन त्यांना सन्मानाने देशात सामावून घेतले आहे. पाकिस्तानातील धार्मिक अत्याचार आणि असह्य दैनंदिन जीवनाला कंटाळून अनेकांनी भारतात स्थायिक होण्यास पसंती दर्शविली आहे. सात वर्षांपेक्षा अधिक काळ देशात राहिलेल्या हिंदू नागरिकांना आत्तापर्यंत भारतीय नागरिकत्व देण्यात आले आहे. अशाच प्रकारे भारतीय नागरिकत्व मिळावे किंवा फाळणीनंतर भारतात येऊन स्थायिक झालेल्या नातेवाईकांकडे पाकिस्तानामधून आलेल्यांची संख्या लक्षणीय आहे.

पहलगाम हल्ला आणि भारताने नुकतेच या हल्ल्याला दिलेले "ऑपरेशन सिंदूर" ने दिलेले उत्तर पाहता सध्या देशाच्या सीमेवर तणाव वाढत आहे. त्यातच आता दीर्घकालीन अथवा लाँग व्हिसावर भारतात राहत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी काही कागदपत्र सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. "पाकिस्तानी नागरिकांचे दीर्घकालीन व्हिसा धोरणा" अंतर्गत हे आदेश देण्यात आले आहेत.

भारतीयत्व मिळाले नसलेल्या नागरिकांना ही प्रक्रिया पार पडावी लागणार आहे. यामध्ये सध्याचा वैध व्हिसा, व्यवसाय आणि धर्म सिद्ध करणाऱ्या अशा काही कागदपत्रांचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी याबाबतचे पत्र प्रसिद्ध केले असून, १० मे पर्यंत ऑनलाईन पद्धतीने ही प्रक्रिया पार पडावी लागणार आहे.




### इथे करा अर्ज

» भारतात राहणाऱ्या आणि भारतीय नागरिकत्व मिळालेले नसलेल्यांनी १० मे २०२५ पासून ई-एफआरआरओ पोर्टल द्वारे (https://indianfrro.gov.in) पुन्हा ऑनलाईन अर्ज करावा. दीर्घकालीन व्हिसासाठी पुन्हा अर्ज करण्यासाठीचे अर्ज दिनांक १० मे पासून दिनांक १० जुलै २०२५ पर्यंत उपलब्ध असेल. त्या कालावधीत पुन्हा अर्ज केले नाही तर अशा पाकिस्तानी नागरिकांचा दीर्घकालीन व्हिसा रद्द करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.

### पुन्हा अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

- वैध दीर्घकालीन व्हिसाची प्रत.
- अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो (पांढरा पार्श्वभूमी).
- नवीनतम निवासी पत्त्याच्या पुराव्याची प्रत.
- व्यवसाय आणि धर्म सिद्ध करणारे तपशील.
- जर भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज सादर केला असेल तर अर्जाची प्रत.

> व्यवसायानिमित्त २९० सिंधी-हिंदू नागरिक पाकिस्तानातून ५ वर्षांपूर्वी पिंपरी-चिंचवडमध्ये आले आहेत. सात वर्षांनंतर त्यांना भारतीयत्व दिले जाते. वीस-पंचवीस वर्षांपूर्वीपासून येथे राहण्यासाठी आलेल्या ३०० हून अधिकांना यापूर्वी भारतीयत्व देण्यात आले आहे. भारत सरकारने निश्चितच काहीतरी विचार करून पुन्हा कागदपत्र सादर करण्यास सांगितले असणार. लाँग टर्म व्हिसावर राहणारे निर्धारित कालावधीत ही प्रक्रिया पार पाडतील
>
> - हिरानंद ऊर्फ डब्बू आसवानी, माजी उपमहापौर, पिंपरी-चिंचवड

# गणेशमूर्ती निर्मितीबाबत उत्पादकांमध्ये संभ्रम

## गणेश मूर्ती पीओपी की शाडू माती मूर्तीबाबत आदेश नसल्याने द्विधा मनस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सवाकरिता गणेशमूर्ती तयार करणाऱ्या उत्पादकांचे काम सुरू झाले असून, गणेशमुर्ती नेमक्या पीओपीच्या की शाडू मुर्तीच्या तयार कराव्यात, याबाबत स्पष्ट आदेश नसल्याने उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात पीओपी गणेशमूर्तींवर बंदी आल्यास आर्थिक कोंडी होऊ नये, याकरिता पीओपीबरोबरच शाडू मातीच्या गणेश मूर्ती तयार करण्याचा पर्याय या उत्पादकांनी स्विकारला आहे.

पिंपरी चिंचवड शहरात 20 ते 25 गणेशमुर्ती उत्पादक कार्यरत आहेत. पिंपळे गुरव, आकुर्डी, रावेत, चऱ्होली या भागात त्यांचे कारखाने सुरू आहेत. यंदा ऑगस्ट महिन्याच्या शेवटी येणाऱ्या गणेशोत्सवाकरिता या उत्पादकांकडून कच्चा माल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पर्यावरणाला हानीकारक असल्याने गतवर्षी पीओपीच्या गणेशमूर्तींवर बंदी घालण्यात आली असतानादेखील अगदी शेवटच्या काही दिवसांत याबाबत कारवाई न करण्याच्या तोंडी सूचना आल्याने गेल्यावर्षी मूर्ती उत्पादकांना दिलासा मिळाला होता.

यंदा पीओपीच्या गणेश मुर्तींवर बंदी असून, बृहन्मुंबई महापालिकेने शहरातील गणेशमुर्ती उत्पादकांची बैठक आयोजित करून, त्यामध्ये शाडूची माती मोफत देण्याची तयारी दर्शविली होती. मात्र, याबाबत पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाची आतापर्यंत कोणतीच तयारी दिसत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे ऐनवेळी राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाच्या पीओपी गणेशमूर्तींवर बंदीच्या आदेशाचे पालन करण्याच्या सूचना मिळाल्यास, या उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसू शकतो. तर महापालिका प्रशासनाकडून अद्यापही कोणतीच सूचना न आल्याने या उत्पादकांची चिंता वाढली आहे.



### पीओपी मूर्तींना परवानगीची शक्यता?

» पीओपी मूर्तींचा जलस्त्रोतावरील परिणामांचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीने विशिष्ट जागेत विसर्जन, नव्या मूर्ती घडविताना विसर्जित मूर्तींचा पुनर्वापर आणि अधिकाधिक नैसर्गिक रंग वापरत जलप्रदूषण कमी करणे शक्य असल्याच्या शिफारशी केल्या आहेत. त्यामुळे नव्या अटी व शर्तींच्या आधारे पीओपीच्या मूर्तींना परवानगी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, तज्ज्ञ समितीच्या या शिफारशींवर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उत्तर आणि न्यायालयाचा निर्वाळा यावर पीओपीवरील बंदीचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

> कारखान्यात गणेशमूर्ती तयार करण्याबरोबरच अन्य कामे वर्षभर सुरू असतात. वर्षभराचे नियोजन ठरलेले असते. त्यादृष्टीन गणेशमूर्ती तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, पीओपी गणेशमूर्तींवर बंदीच्या ऐनवेळी सूचना आल्यास त्याचा फटका बसू नये, याकरिता शाडू मूर्तींची देखील तयारी केली आहे.
>
> - एक उत्पादक

# जनसंपर्काच्या जोरावर मी पुन्हा येणार : शिवाजीराव आढळराव पाटील

## 2029मध्ये जनतेला वाटले तर लोकसभा निवडणूक लढवू. त्यात चुकीचे काय आहे, असे प्रतिपादन म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

**पुणे | प्रतिनिधी**

नागरिकांच्या संपर्काच्या जोरावर मी पुन्हा येणार असून 2029 मध्ये जनतेला वाटले तर लोकसभा निवडणूक लढवू. त्यात चुकीचे काय आहे, असे प्रतिपादन म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

लांडेवाडी येथे शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषेदेत आढळराव पाटील यांनी विविध विषयांना स्पर्श केला. मागील 20 वर्षांच्या राजकारणात एक रुपया खाल्ल्याचा आरोप माझ्यावर झाला नाही. खासदार नसताना सुद्धा मंचर नगरपंचायतीसाठी 100 कोटींचा निधी आणला आहे. शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी 136 कोटी मंजूर केले.

मात्र काही जण मंचर नगरपंचायतीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करताहेत. या कामांची टेंडर निघून ती पूर्ण होत आली आहेत. मग आताच भ्रष्टाचाराचा आरोप कसा होतो, असा सवाल करून ते म्हणाले निवडणुका लवकरच होणार आहेत. काम करणाऱ्या एका ठेकेदाराने मला सांगितले की, संबंधितांनी ठेकेदाराकडे 10 लाख रुपयांची मागणी केली होती. ते न दिल्यानेच भ्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत, अशा बोलण्याला मी किंमत देत नाही, असे आढळराव पाटील यांनी स्पष्ट केले.

मी राजकारणात सक्रिय आहे. दररोज लोकांना भेटतो, रविवारी जनता दरबार नित्यनेमाने सुरू आहे. गावागावात विकास कामांसाठी निधी दिला जातोय. मी सक्रिय राहणार व पुन्हा येणार 2029 मधील लोकसभा निवडणुक लोकांना वाटले तर लढवणार असून त्या चुकीचे काय असा सवाल त्यांनी केला. शिरूर लोकसभा मतदारसंघातील विकास कामांचा पाठपुरा केला जात नाही.विशेषता 2019 पासून पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न प्रलंबित आहे असे सांगून पाठपुरावा का होत नाही हे जनतेला समजले पाहिजे. असे त्यांनी सांगितले.

शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या पत्रकार परिषेदेत आढळराव पाटील यांनी विविध विषयांना स्पर्श केला. मागील 20 वर्षांच्या राजकारणात एक रुपया खाल्ल्याचा आरोप माझ्यावर झाला नाही. खासदार नसताना सुद्धा मंचर नगरपंचायतीसाठी 100 कोटींचा निधी आणला आहे. शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी 136 कोटी मंजूर केले. मात्र काही जण मंचर नगरपंचायतीच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करताहेत. या कामांची टेंडर निघून ती पूर्ण होत आली आहेत. मग आताच भ्रष्टाचाराचा आरोप कसा होतो, असा सवाल करून ते म्हणाले निवडणुका लवकरच होणार आहेत. संबंधितांनी ठेकेदाराकडे 10 लाख रुपयांची मागणी केली होती. ते न दिल्यानेच भ्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत, अशा बोलण्याला मी किंमत देत नाही, असे आढळराव पाटील यांनी स्पष्ट केले.



### जनता दरबारात समस्या सोडवण्याचा प्रयत्न

» लोकसभेतील पराभवानंतरही मी राजकारणात व सामाजिक जीवनात सक्रिय आहे. सर्वसामान्य लोकांना भेटतो, जनता दरबारात समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातोय. गावागावांमध्ये विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. माझा पराभव जरी झाला असला तरी मी घरी बसलेलो नाही, असे शिवाजीराव आढळराव पाटील यांनी नमूद केले.

### स्थानिक पातळीवर युती अवघड

» स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्याची आमची भूमिका आहे. युतीचा निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल. मात्र ग्रामीण भागात युती होईल असे वाटत नाही. वरिष्ठ जो निर्णय देतील. त्यानुसार काम करणार असल्याचे आढळराव पाटील यांनी सांगितले.

### वाढदिवसानिमित्तचा संकल्प

» म्हाडाच्या मार्फत ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात सदनिका उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. जे काम चालू आहे ते सुरू ठेवण्याचा संकल्प वाढदिवसाच्या निमित्ताने केला असल्याचे आढळराव पाटील म्हणाले.

# खातेदारांच्या मृत्यूमुळे येणाऱ्या अडचणी सुटणार!

## जिल्ह्यातील 20 हजार सातबारा उताऱ्यांवर लागणार वारसांची नावे, गावनिहाय सर्व्हेनंतर आता फेरप्रक्रिया सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील 20 हजार सातबारा उताऱ्यांवर मृत खातेदारांची नावे कायम आहेत. त्यामुळे वारसांना अनेक अडचणी येत आहेत. त्या दूर करण्यासाठी तलाठ्यांद्वारे गावनिहाय सर्व्हे करण्यात आला असून, 'जिवंत सातबारा' मोहीम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्यासाठीची फेरफार प्रक्रिया सुरू झाली असून, सातबारा उताऱ्यांवर मृत खातेदारांच्या जागी वारसांची नावे लागणार आहेत.

शासनाच्या 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत 'जिवंत सातबारा' ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची अंमलबजावणी करण्यासाठी ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून गावनिहाय सर्व्हे करण्यात आला यामध्ये सातबारा उताऱ्यावरील 20 हजार 178 खातेदार मृत असल्याचे निदर्शनात आले आहे. या मृतांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित अधिकार मिळावेत, यासाठी 'जिवंत सातबारा' मोहीम जिल्ह्यात राबविण्यात येत असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (कूळ कायदा) नामदेव टिळेकर यांनी सांगितले. या कालबद्ध मोहिमेसाठी तहसीलदार त्यांच्या तालुक्यासाठी समन्वय अधिकारी, तर जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी नियंत्रण अधिकारी आहेत.



### जिल्ह्यात फेरफारची प्रक्रिया गतिमान

» या कालबद्ध मोहिमेसाठी तहसीलदार त्यांच्या तालुक्यासाठी समन्वय अधिकारी, तर जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी नियंत्रण अधिकारी आहेत. जिल्ह्यात फेरफार नोंदीची कामे प्रगतिपथावर असल्याने मोहिमेची प्रक्रिया सुलभरीत्या होत असल्याचे वास्तव आहे.

### वेळ अन् पैशाची बचत; कामेही होतात झटपट

» या मोहिमेमूळे मृत खातेदारांच्या वारसाला फेरफारसाठी लागणारा वेळ व पैशाची बचत होत आहे. कमी अवधीत हक्काची शेतजमीन वारसाचे नावे होत असल्याने मोहीम कल्याणकारी ठरत आहे.